## प्रकरण पहिले

## मराठी कादंबरीचे स्वरूप आणि मराठवाड्यातील कादंबरीलेखन

प्रास्ताविक :

कादंबरी हा मराठी साहित्यातील एक महत्वाचा वाङ्.मयप्रकार असून कादंबरीची विविधरूपे मराठी साहित्यात दिसतात. प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये मराठवाड्यातील अलिकडील एक महत्वाचे कादंबरीकार भीमराव वाघचौरे यांच्या कादंब-यांचा अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास मांडण्याआधी मराठी कादंबरीचे स्वरूप, १९६० नंतर निर्माण झालेल्या ग्रामीण कादंबरीचे लेखन तसेच मराठवाड्यातील कादंबरी लेखन या गोष्टींचा अभ्यास करावा लागेल. अशा त-हेने केलेला अभ्यास भीमराव वाघचौरे यांच्या कादंब-यांचा विचार करताना उपयुक्त ठरेल

" कादंबरी " हा साहित्यप्रकार अलिकडच्या काळातील असला तरी त्याचे बीज प्राचीन काळापासून आढळते. कादंबरी हा साहित्यप्रकार कथा, कविता, नाटक, आत्मचरित्र,प्रवासवर्णने यांच्यापेक्षा प्रकृतीने भिन्न आहे. कादंबरीची एक साचेबंद व्याख्या अजूनही करता आलेली नाही कारण बदलत्या सामाजिक जीवना-प्रमाणे कादंबरीनेही अनेक रूपे धारण केलेली आहेत. कादंबरी या वाङ्.मय प्रकाराला व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न अनेक विद्वानांनी केला आहे पण हा साहित्यप्रकार व्याख्या करण्यात जितका सोपा वाटतो तितकाच अवघड आहे काही विद्वानांनी कादंबरीची संपूर्ण व्याख्या करता येणे कठीण आहे याची जाणीव ठेवूनच व्याख्या केलेल्या आहेत. तिची व्याख्या का करता येत नाही ? या प्रश्नाच्या उत्तरातच तिचे स्वरूप आणि विशेष दडलेले आहेत. कादंबरीची

प्रत्येक व्याख्या तिच्या काही पैलूवरच फक्त प्रकाश टाकते. कादंबरीचे संपूर्ण दर्शन घडवणारी व्याख्या निर्माण होणे अशक्य आहे. कारण दिवसेंदिवस बदलत जाणारे तिचे रूप तिच्या वाढत राहणाऱ्या कक्षा, जीवनाला स्वतःत सामावून घेण्याची तिची वृत्ती हे आहे. एखाद्या अभ्यासकाच्या तडफेने कादंबरी जीवनशोधाची वाटचाल करते आहे आणि कादंबरीचे अभ्यासक तिच्या मागे धावत आहेत. तरीही तिच्या भविष्याच्या स्वरूपाबद्दल कोणताच अंदाज वर्तविता येत नाही.

आज कादंबरी हा वाङ्मयप्रकार प्रकार सर्वात महत्वाचा साहित्यप्रकार आहे. कादंबरीच्या लोकप्रियतेची काही कारणे आहेत. कारण तिने कविता, नाटक, कथा, चरित्र, प्रवासवर्णने पत्र, निबंध, ललितलेख या सर्व वाङ्मयप्रकाराची आणि वाचकांची एकात्मता साधली आहे आणि यातूनच तिने आपले स्थान निश्चित केले आहे. कादंबरीची लोकप्रियता ही अशी संघटीत स्वरूपाची आहे.

## कादंबरीचे स्वरूप :

कादंबरीचे स्वरूप आणि वैशिष्टये यांचा अभ्यास करण्यासाठी तिच्या व्याख्यांचा विचार करावा लागतो. अनेक अभ्यासकांनी कादंबरीच्या विविध अंगाचा विचार करून व्याख्या केलेल्या आहेत. परंतु संपूर्ण सर्वसमावेशक व्याख्या कुणालाच करता आलेली नाही हे वरती नमूद केलेले आहेच तथापि तिच्या विविध बाजूवर मात्र या व्याख्यांच्या आधारे प्रकाश पडून कादंबरीचे स्वरूप काय ? तिची वैशिष्टये कोणती ? तिची उत्पत्ती कशी झाली?यांचा आपण विचार करणे शक्य आहे.

कादंबरी हा वाङ्.मयप्रकार अत्यंत गुंतागुंतीचा आहे. मानवाच्या जीवन जगण्याच्या पध्दती जशा बदलतील त्याप्रमाणे लेखकाची अनुभूतीही बदलते आणि कादंबरीची संरचनाही बदलते. कादंबरीच्या स्वरुपाची वैशिष्टये पाहायची म्हटली म्हणजे त्यातील सामाजिक आशय व सामाजिक संदर्भ हे खूपच वास्तवाच्या जवळचे असतात. कादंबरी हा वाङ्.मयप्रकार लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक असा वाङ्.मयप्रकार आहे. त्यामुळेच साहित्य चर्चेत साहित्य व समाज, कला व निती, समाजवाद व व्यक्तिवाद साहित्याची लोकाभिमुखता, साहित्य व राजकारण, साहित्य व तत्वज्ञान, इ. वाद जे निर्माण झाले आहेत ते प्रामुख्याने कादंबरीच्या बहुविध स्वरुप वैशिष्टयामुळेच. त्यामुळे चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात " काहीशा क्षण स्फुरणातून व्यक्त होणा-या व कमी अवकाश व्यापणा-या काव्याप्रकारापेक्षा कादंबरीचे जीवन-सदृशत्व अधिक असते. जीवनातले तरल क्षण पकडण्यापासून ते विराट समाजजीवनाचे दीर्घकालीन जीवनचित्रण करण्याचे सामर्थ्य कादंबरी वाङ्.मयात असल्यामुळे तसेच तिचे आवाहनही व्यापक व खोलवर असल्यामुळे साहित्याचे गाभ्याचे प्रश्नही कादंबरीच्या क्षेत्रात उत्पन्न होतात व त्यांचे विश्लेषण, विवेचन सर्व वाङ.मयप्रकारांना अधिकांशत: लागू होते ".[1] कादंबरी या वाङ्.मयप्रकारात लेखकाची विशिष्ट जीवन-दृष्टी व्यक्त होत असते. लेखकाच्या या जीवनदृष्टीच्या खोलीवर व सूक्ष्मपणावर त्यांच्या कादंब-या अवलंबून असतात. बाबू गुलाबराय आपल्या " काव्य के रूप " ग्रंथात म्हणतात " उपन्यास कार्यकारण शृंखलासे बंधा हुआ वह गद्य कथानक है, जिसमे उपेक्षाकृत अधिक विस्तार तथा पेचीदगीसाथ वास्तविक जीवन प्रतिनिधित्व करनेवाले व्यक्तियोंसे संम्बधित वास्तविक और काल्पनिक घटनाओं द्वारा

मानवी जीवन के सत्य का रसात्मक रूप से उद्घाटन किया जाता है ।[2] या व्याख्येत गुलाबराय कादंबरीच्या अनेक अंगाना स्पर्श करतात. कादंबरीतील जीवनानुभव, वास्तवता, मानसिक गुंतागुंत, काल्पनिक कलात्मकता आणि कथेतील विस्तार हे सर्व साखळीप्रमाणे एकमेकाशी बांधलेले असतात असे ते म्हणतात. त्यामुळे ही व्याख्या संपूर्णतेकडे झुकणारी आहे. कुसुमावती देशपांडे म्हणतात " पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती, जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्भुताचा मार्ग धरून मुलत: मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोण, जीवनविषयक अनुभव व कल्पना हा कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री ही वृत्ती. हा दृष्टिकोण हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्या आधारे व्यक्त करणे ही कादंबरीची पध्दती ।[3] त्यांनी कादंबरीत व्यक्त होणाऱ्या विविध भावनांचा व जीवनविषयक समस्यांचा उहापोह कादंबरीत होतो हे या व्याख्येतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. समाजाच्या विविध स्थरात होणाऱ्या परिवर्तनशील बरोबरच कादंबरीचा ढाचा सुध्दा बदलत असतो हेच यावरून दिसून येते.

समाजाच्या अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेता घेता कादंबरी निर्माण होत असते. समाजाच्या विविध स्तरात होणारे बदल, नैसर्गिक आपत्ती आणि त्याचा होणारा परिणाम याचे सर्वव्यापी चित्रण कादंबरीत असते. मानवी जीवनातील मूल्यांचा शोध घेणे हे कादंबरीचे ध्येय असते. कादंबरीतून चित्रित होते ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवनाचे कादंबरीत चित्रित होणारे जीवन हे प्रत्यक्षातील जीवन नसते परंतु ते जीवना-

तारखे असते, जीवनाशी संवादी असते म्हणूनच चांगल्या कादंबरीतून आपणास जीवनाचा प्रत्यय येत असतो.

" कादंबरीची रचना " या आपल्या ग्रंथात श्री. मा. कुलकर्णी म्हणतात " कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी "[४] वरील व्याख्येत कुलकर्णी यांनी कार्यकारण शृंखलाबध्दतेला, काल्पनिकतेला आणि मानवी जीवनाला महत्वाचे स्थान दिले आहे तरीही ही व्याख्या विविध अंगाना स्पर्श करून जात नाही . तसेच त्यांनी कल्पनेला जास्त महत्व दिलेले आहे. कादंबरीत जरी संपूर्णपणे वास्तववादी चित्रण नसले तरी जीवनातील वास्तव अशा मुलभूत समस्यांचा उहापोह हा कादंबरीतून व्यक्त होत असतो त्यामुळे ही व्याख्या अपूर्ण वाटते. तथापि रा. ग. जाधवांच्या खालील व्याख्येत ते जास्तीत जास्त समावेशकता आणण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणतात, " कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोण व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली, इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटीत केलेले वास्तवजीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय "[५] जाधव संघटनशिलतेला जास्त महत्त्व देतात हे लक्षात येते. जीवनातील सर्व प्रकारचा आशय हा संघटीतरूपात कादंबरीतून व्यक्त होत असतो असे त्यांचे म्हणणे आहे.

भालचंद्र नेमाडे आपल्या विस्तृत व्याख्येत लिहितात, " " कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरीत ह्या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकल्याने

मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो एखादया समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखादया पोटसमुहाचे पोटसंस्कृतीचे तपशिलासह दर्शन घडवलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो, आशयसूत्रे बळकट असतात पात्रे सलग अशी राहतात.[६] नेमाडे यांची ही व्याख्या कादंबरीची अनेक वैशिष्टये स्पष्ट करून नेमकेपणाने कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करणारी आहे. कादंबरीच्या विस्तृतता, कलात्मकता, वास्तवता, जीवनाभिमुखता, कल्पकता इ. गुणांना स्पर्श करणारी आहे. कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराबाबत तर ती वास्तववादी प्रवृत्तीची असते. त्यातील रंजकतेच्या घटकापेक्षा वैचारिकतेला अधिक महत्व येत गेलेले दिसते. कादंबरीत जीवनाच्या साकल्याचा समग्रतेचा वेध घेण्याचा प्रयत्न असतो कारण कादंबरीचा पट अधिक विस्तृत असतो कादंबरीत स्थल, काल व घटनांचे विविध पडसाद उमटत असतात.

कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराच्या स्वरूपावर आणि वैशिष्टया- वर गंगाधर गाडगीळ यांनी फार वेगळया पध्दतीने प्रकाश टाकला आहे ते म्हणतात, " कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी असते. कादंबरीत अनेक केंद्रे असतात. स्वतंत्रपणे विकास पावणारी अनेक कथाबीजे असतात. वेगवेगळया घटकांतून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. पुष्कळदा तिच्यातील भिन्न कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात, मात्र असे नेहमीच असते असे नाही. कधी कधी या भिन्न कथासुत्रातील पात्रांचा आणि त्यांच्या कृतीचा व्यावहारिक संबंध अत्यल्प असतो, गौण असतो आणि मुळीच नसतो पण ते काही असले तरी कोणत्याही कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्पराशी कलात्मक संबंध मात्र निश्चित असतो.[७]

कादंबरीच्या संरचनेच्या संबंधी गाडगीळ यांचे हे विवेचन निश्चितच विस्तृत आणि योग्य आहे यातून तिच्या स्वरूपावर आणि वैशिष्टयावर प्रकाश पडतो. तरीही गाडगीळ पात्राच्या परस्परसंबंधातील चित्रणाला फारसे महत्त्व देत नाहीत. कादंबरीत पात्रांच्या एकमेकाशी असलेल्या संबंधाला फार महत्व असते. या व्याख्येतून त्यांचा कलावादी दृष्टिकोण व्यक्त होतो. प्रेमचंद आपल्या व्याख्येत म्हणतात " मै उपन्यास को मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्रपर प्रकाश डालना और उसके रहस्यों को खोलना ही उपन्यासों का मूलतत्व है "[8] असा विस्तृत व्याख्यामधून अथवा एक वा दोन वाक्यी व्याख्यामधून सुध्दा कादंबरीच्या स्वरूप वैशिष्टयांचा विचार केलेला आढळतो. संपूर्ण एकच एक अशी व्याख्या जरी निर्माण झालेली नसली तरी असा अनेक अभ्यासकांच्या व्याख्यांमधून आपल्याला कादंबरीच्या स्वरूपाची पुरेशी कल्पना आलेली आहे. कादंबरीच्या संरचनेचा संपूर्ण उलगडा होण्यासाठी तिच्या घटकांचा सुध्दा विचार करावा लागेल.

**कादंबरीचे घटक :**

कादंबरी जरी अव्याख्येय असली, तिची निश्चित अशी व्याख्या देता येत नसली, तरी तिचे निश्चित असे घटक सांगता येतात. कादंबरीचे स्वरूप निश्चित नसले तरी तिचे घटक मात्र कमी अधिक प्रमाणात प्रत्येक कादंबरीत आढळतात. कादंबरीकार आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने या घटकांचा कौशल्याने वापर आपल्या लेखनात करत असतो कादंबरीने आजपर्यंत अनेक रूपे धारण केली तिच्या घटकात मात्र बदल झाला नाही. कथानक, व्यक्तिरेखन, संघर्ष, वातावरण, भाषाशैली इ. कादंबरीचे घटक मानले जातात हे घटक कादंबरीमध्ये

कशाप्रकारे आढळतात याबद्दलचे विवेचन आपल्याला करायचे आहे.

१. कथानक :

कथेमधूनच कादंबरी उदयास आली असे अनेक अभ्यासकांचे मत आहे आणि हे खरे मानण्यास काही हरकत नाही कारण कथा ही आशयाचे दृष्टीने लहान असते अन् कादंबरी ही विस्तृत अवाका असलेली असतेपण या दोन्ही प्रकारात कथानक असते. साहित्यात / वाङ्मयात कथानकाला फार महत्त्वाचे स्थान असते. कथानकाभोवतीच कादंबरीचा सारा पट फिरत असतो. तरीही कथानक म्हणजेच फक्त कादंबरी नव्हे तर कथानकावर इतर सारे घटक संस्कार करत असतात. कादंबरीच्या संस्कारात अनेकविधता असते. हा संस्कार अनेकांगी असल्याने संमीश्र असतो. कादंबरीतील अनुभव, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण हे सर्वच घटक दीर्घ असतात. कथानकाला संविधानक ( plot ) असे म्हटले जाते.

कथानक म्हणजे काय असते ? या प्रश्नाचे उत्तर आपणाला शोधायचे असेल तर रेनेवेलेक आणि ऑस्टिन वॉरेन या लेखकांनी त्यांच्या " थेअरी ऑफ लिटरेचर " या ग्रंथात दिलेले उदाहरण उपयोगी पडेल. ते म्हणतात " राजा मेला आणि राणी मेली " या पाठोपाठ घडणाऱ्या घटना आहेत. याला कथानक म्हणता येणार नाही पण याच घटना जर " राजा मेला आणि दुःखाने राणी मेली " अशा पध्दतीने लिहल्या तर ते कथानक होते .[१] यामध्ये कार्यकारणभाव आढळतो. कार्यकारणभावामुळेच कथानक कादंबरीपर्यंतचा प्रवास करत असते. एखादया कादंबरीकाराने जर सुरूवातीला फुलाच्या झाडाचे वर्णन केले असेल तर ती फुले त्याला कोणाच्या तरी केसात माळावीच लागतात. म्हणजेच कादंबरीतल्या

प्रत्येक कृतीचा एकमेकांशी काहीतरी संबंध हा असतोच.

२. व्यक्तिरेखन :

कादंबरी ही मुळातच मानवाच्या अनुभवविश्वातून येते. मानवाच्या भावजीवनाशी तिचा संबंध असतो. अशाच एखादया घटनेतून कथाबीज रुचते व त्याचा महावृक्ष होऊन कादंबरी निर्माण होते. कादंबरीला जसे कथानक आवश्यक असते त्याचप्रमाणे कथानकाला पात्रांची आवश्यकता असते. त्यामुळे कोणतीही कलाकृती घेतली तरी तिच्या केंद्रस्थानी माणूस असतो. माणसाला केंद्रबिंदू समजून त्याच्या भोवती कथानकाची गुंफण करुन कथा लिहली की ती कादंबरी होते. म्हणून कादंबरीत पात्रे आले की त्याचे चित्रणही होते म्हणजेच व्यक्तिरेखन ही होते.

हाताची पाची बोटे सारखी नसतात त्याचप्रमाणे प्रत्येक माणूस वेगळा असतो त्याचे स्वभाव, गुणविशेष, वागण्याची, बोलण्याची पध्दत या सर्व गोष्टीमुळे तो आपले वेगळेपण सिध्द करत असतो. अशी सर्व व्यक्तिगत वैशिष्टये शब्दात मांडणे म्हणजेच पात्रांची उभारणी करणे होय. यामध्ये लेखकाला खूप कौशल्य दाखवावे लागते. कादंबरीत नायक, नायिका, खलनायक अशा विविध व्यक्तिरेखा कार्य करत असतात व त्यांचा कथानकाच्या साहयाने एकमेकांशी कार्यकारणभाव साधलेला असतो.

काही काही कादंब-यात व्यक्तीच्या ऐवजी प्राणी किंवा निसर्ग यांना केंद्रस्थानी मानून लेखन केलेले असते परंतु ते चित्रणसुध्दा प्रतीकात्मकपणे मानवाच्याच भावविश्वाचे असते. उदा. सत्तांतर व्यंकटेश माडगूळकर

अशाप्रकारे व्यक्तिरेखन हा मुद्दा कादंबरीचा महत्वाचा घटक आहे.

३. संघर्ष :

निसर्गामध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये संघर्ष चालू असतो. मानवामध्ये मुद्दा संघर्ष चालू असतो. साहित्याचा केंद्रबिंदू आपण मानवाला मानले आहे. त्यामुळे मानवी संघर्षाचे चित्रण अपरिहार्यपणे साहित्यात अथवा कादंबरीत होत असते. संघर्ष हा मग मानसिक अथवा सामाजिक अथवा सांस्कृतिक, राजकीय असेल पण यासंघर्षाचे चित्रण कादंबरीत असते. मानसिक संघर्ष हा मनाचा संघर्ष असतो. निसर्गातील वातावरण जसे बदलते त्याप्रमाणे मानवी मनही सतत बदलत असते. एका मनाचा दुस-या मनाशी, दुस-याचा तिस-याशी संघर्ष अशी शृंखला निर्माण होते आणि अशा मानसिक संघर्षातूनच कादंबरी लेखन होत असते. कादंबरीच्या संघटनेला संघर्ष हा अपरिहार्य घटक आहे.

४. वातावरण :

कादंबरी ही वाचकाला एकावेगळ्याच भाव विश्वात घेऊन जात असते. त्या भावविश्वाचे वास्तव स्वरूप समजून येण्यासाठी वातावरण निर्मिती हा महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी हा वास्तववादी वाङ्.मयप्रकार आहे. वास्तवाचा अधिक स्पष्ट प्रत्यय येण्यासाठी कादंबरीतील पात्रे ज्या वातावरणात कार्यरत असतात त्याचा ठसा वाचकाच्या मनावर स्पष्ट उमटावा म्हणून कादंबरीकार सतत प्रयत्न करत असतो. वातावरण निर्मितीसाठी कादंबरीकार अनेक प्रकारच्या

युक्त्या वापरत असतो. कादंबरीचा प्रभाव लोकांच्या मनावर दीर्घकाळ राहण्यासाठी वातावरण निर्मितीला फार महत्व आहे. म्हणूनच कादंबरीचा हा घटकमुद्दा फार महत्वाचा आहे.

५. भाषाशैली :

लेखकाला जो अनुभव येतो त्या अनुभवाची निवड करुन योग्य रीतीने मांडणे म्हणजे शैली होय. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषा व शैली हे दोन वेगवेगळे घटक आहेत. भाषेशिवाय कादंबरी अस्तित्वात येऊ शकत नाही. भाषाशैली प्रत्येकाप्रमाणे वेगळी असते. ज्याप्रमाणे १० कोसानंतर भाषा बदलते त्याप्रमाणे ती व्यवसाय विशिष्ट, लिंगविशिष्ट, प्रदेशविशिष्ट, वंश-विशिष्टही असू शकते. भाषाशास्त्रामध्ये याशैलीचा सूक्ष्मपणे अभ्यास केलेला आढळतो. भाषाशैलीमधून लेखकाला जाणवलेला आशय-गर्भ आहे. तसा मांडण्याची शक्ती असते, म्हणूनच शैलीची व्याख्या भालचंद्र नेमाडे अशी करतात, " एखादया द्रव्याला विशिष्ट रुपामध्ये प्रगट करण्याकरिता वापरला जाणा-या तंत्र समच्चयाची पध्दती म्हणजे शैली होय. " आतापर्यंत आपण कादंबरीच्या कथानक, व्यक्तिरेखन, संघर्ष, वातावरणनिर्मिती या घटकांचा अभ्यास केला पण हे सर्व घटक भाषाशैलीतूनच अविष्कृत होतात म्हणूनच भाषाशैली हा महत्वाचा घटक आहे.

कादंबरीचे वेगळेपण :

सर्व वाङ्मयप्रकारात महत्त्वाचा असलेल्या कादंबरीचे मोठेपण तपासण्याचा प्रयत्न केला तर असे दिसते की तिने काव्य, नाट्य, कथा, चरित्र इ. सर्व वाङ्मयप्रकाराचे विशेष स्वत:त सामावले आहेत.

त्यामुळे कादंबरीची लोकप्रियता संघटीत स्वरुपाची आहे. या बाबतीत प्रेमचंद यांचे मत फार चांगले आहे ते म्हणतात " अगर आपको इतिहास प्रेम है, तो आप अपने उपन्यास में गहरे से गहरे ऐतिहासिक तत्त्वो का निरूपण कर सकते है। अगर आपमें कवित्व शक्ती है तो उपन्यास में उसके लिए काफी गुंजाइश है। यहाँ लेखक को अपनी कलम का जोहर दिखाने का जितना अवसर मिल सकता है उतना साहित्य के और किसी अंग मे नही मिल सकता"[10] कादंबरी लेखनात लेखकाला विविध विषयात वावरण्याचा फायदा मिळतो. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीत अशा अनेक विषयाचा उहापोह केलेला आढळतो. कादंबरीला कुठलाही विषय नको नसतो आणि तो तसा नसावाही कारण कादंबरीतून ज्ञानासाठी उद्बोधन होत असते.

कादंबरीत काव्यगुण्दा असते. कादंबरीतील नायक हळवा, संवेदनशील होतो तेव्हा तो काव्यात्मच बोलतो. कादंबरीत संघर्षाचे चित्रण असते त्यामुळे मानसिक अवस्थांचे चित्रण हे जे काव्याचे प्रमुख लक्षण आहे ते कादंबरीच्या पानापानात भरलेले असते. कादंबरीतील एक घटक " पात्र " ही पात्रे जेव्हा एकमेकांशी सुसंवाद साधतात तेव्हा ती नाटयमय बोलतात आणि कादंबरीत नाटयमय वळणे खूप असतात. म्हणजेच कादंबरीत नाटयगुण्दा असते. चरित्र आत्मचरित्र हे स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून गणाले गेले असले तरी त्यातील घटकांना कादंबरीने आपल्यात सामावून घेतलेले आढळते म्हणूनच काही काही कादंबऱ्या वाचताना आपल्याला चरित्रच वाचल्याचा भास होतो. उदा. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्या तसेच आनंद यादव यांची " झोंबी " ही कादंबरी याचे उदाहरण आहे. तर वा. म. जोशी यांची " इंदू काळे सरला भोळे " पु. शि. रेगे यांची " सावित्री " अशा पत्रात्मक कादंबऱ्या लिहून

पत्र वाङ्.मया--ला सुध्दा आपल्यात सामावून घेतले आहे. कादंबरी ही इतर सर्व वाङ्.मय प्रकारांना स्पर्श करुन जाते. अशा प्रकारे कादंबरीचे वेगळेपण आपल्याला दिसून येते. कादंबरीतून विशिष्ट अनुभवांच्या माध्यमातून सार्वकालिक जीवनसत्यांचा अविष्कार घडलेला असतो म्हणूनच कादंबरीचे वेगळेपण हे ठसठसीत आपल्या डोळयात भरते. विस्तृत असा जीवनपट वेगवेगळा जीवनप्रवाह कादंबरीत दिसून येतो. कादंबरी ही वास्तवजीवनातील जीवनसत्वे कलात्मकरीतीने आविष्कृत करणारी भाषिक रचना असते.

कोणत्याही संकल्पनेचा अभ्यास सर्वांगाने करायचा असतो. कादंबरीची संकल्पना अभ्यासताना तिचा सर्व बाजूनी विचार करावा लागतो. मराठी कादंबरीत अनेक प्रकारचे बदल झालेले आढळतात. अनेक परिवर्तने तिने स्वीकारली, नाविन्याचा स्वीकार करणे, दोषांचा नायनाट करत तिची जडणघडण झालेली आहे. तिच्या निर्मितीमागच्या प्रेरणा पण बदललेल्या दिसून येतात पण भालचंद्र नेमाडे यांनी मात्र यमुनापर्यटन, मुक्तामाला व मोचनगड या प्रवृत्ती आज ही आहेत असे लिहले असून या प्रेरणा तिच्या उगमस्थानीच शुध्द स्वरुपात आढळतात असे ही ते म्हणतात. त्यांचे मत पुढीलप्रमाणे " या प्रवृत्ती विकसत, बदलत, परस्परसंयोग करत प्रत्येक कालखंडात व्यक्त होताना दिसतात. या तिन्ही प्रवृत्तीची पाळेमुळे आपल्या वाङ्.मयीन संस्कृतीतच असावी. थेट तेराव्या शतकापर्यंत या प्रवृत्ती शोधता येतील ."[1]

भालचंद्र नेमाडे, या तीन प्रवृत्ती आतापर्यंतच्या मराठी कादंबरीत दिसतात, असे म्हणतात. यमुनापर्यटन सारखा वास्तववाद मुक्तामालासारखा- अवास्तव रंजनवाद आणि मोचनगडसारखा ऐतिहासिक वास्तवाचा आभास करणारा रंजनवाद मराठी कादंबरीमध्ये आजही दिसून येतो. त्यामुळे भालचंद्र नेमाडे यांच्या या

तीनही प्रवृत्ती मान्य करुनच आपणाला मराठी कादंबरीच्या स्वरूपावर प्रकाश टाकता येतो.

कादंबरीची संकल्पना मांडताना सर्व बाजूने अभ्यास होणे गरजेचे असते. याप्रमाणे आपण कादंबरी म्हणजे काय ? तिची वैशिष्टये, तिचे स्वरुप, वेगळेपण, कादंबरीत दिसणारे घटक, त्याविषयक चर्चा केली, व यामधूनच कादंबरीवर प्रकाश टाकला.

कादंबरीच्या आतापर्यंतच्या वाटचालीतून तिने अनेक चढउतार पाहिले आहेत. भविष्यातसुध्दा ती अनेक रुपे धारण करणार आहे. त्यामुळे तिची एकच एक व्याख्या करता येत नाही. डॉ. भीमराव कुलकर्णी म्हणतात " कादंबरीच्या व्याख्या अनेक प्रकारांनी करता येतील परंतु तिच्या लवचिक स्वरुपामुळे कोणतीही व्याख्या संपूर्ण व यथार्थ ठरणार नाही ".[१२] मानवाचे समाजातील जीवन, एकमेकाशी असलेले संबंध, नाना प्रकारचे व्यवहार, मानवाचे विविध नातेप्रकार त्यांचे परस्परसंबंध मानवाच्या असलेल्या आशा, आकांक्षा, सर्व प्रकारच्या भाव-भावना, सुख व दु:खाचे चढउतार, यश- अपयशाशी झालर आणि त्यातून निर्माण होणारे मनोव्यापार व होणारी मानसिक कोंडी ही सर्व कादंबरीची सामग्री असते अशा या सामग्री-तूनच लेखक निवड करुन कादंबरीलेखन करत असतो. म्हणूनच नेमाडे म्हणतात कादंबरी म्हणजे प्रदीर्घ अवकाश असलेली आणि आशय-सूत्राची अनेक पदर असलेली असते असे म्हणतात ते योग्यच आहे.

ग्रामीण साहित्य की प्रादेशिक साहित्य :

" ग्रामीण साहित्य " ही संज्ञा रुढ होऊन आता कितीतरी काळ लोटला आहे. " ग्रामीण साहित्य " असे लेबल लावून ओळखले जाणारे साहित्य ही आता ब-याच प्रमाणात लिहले जावू लागले आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा काय आहेत ? त्याचे

स्वरूप कसे आहे याची सविस्तर चर्चा आनंद यादव यांनी आपल्या समीक्षेतून केली आहे. ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य या दोन्ही प्रवाहात ग्रामीण जीवन हा समान मुद्दा आहे. त्यामुळे प्रादेशिक साहित्य अशी वेगळी संकल्पना न मानता ग्रामीण साहित्य असा एकच शब्द वापरावा असे काही समीक्षकांचे मत आहे तर प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्यापेक्षा विस्तृत आणि सर्वसमावेशक आहे तसेच प्रादेशिक साहित्यामध्ये ग्रामीण समाज ही असतोच त्यामुळे ग्रामीण साहित्य अशी वेगळी संज्ञा रूढ करण्यापेक्षा त्याला प्रादेशिक साहित्यच मानावे असेही काही समीक्षकाचे मत आहे. ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य यांचे प्रवाह एकमेकात मिसळलेले आढळतात. त्यामुळे या दोन संज्ञेबद्दल परस्परवेगळी मते दिसून येतात. ग्रामीण निसर्ग आणि जीवन केवळ ढोबळपणे चित्रित करण्याऐवजी आंतरिक अनुभवातून उत्कटपणे चित्रित झाल्यामुळे ग्रामीण साहित्याचे वेगळेपण दिसून येते.

आनंद यादव म्हणतात," वास्तविक"प्रादेशिक "म्हटल्यानंतर या प्रदेशातील सर्व काही असा अर्थ अभिप्रेत असतो. पण वाङ्मयाच्या संदर्भात प्रस्तुत शब्द वापरताना त्या प्रदेशातील ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो म्हणून प्रादेशिक वाङ्मय एका अर्थी"ग्रामीण वाङ्मय "च असते".[13] पुढे ते म्हणतात " ग्रामीण हा शब्द त्या त्या प्रदेशातील शहरी वाङ्मयाला आपोआप व्यावर्त करणारा आहे म्हणून"प्रादेशिक वाङ्मय " असे न म्हणता या सर्वांना मिळून " ग्रामीण वाङ्मय " असाच शब्द प्रयोग करणे जास्त योग्य वाटते ".[14] यादव यांच्या मतानुसार कोणतेही साहित्य हे

एक विशिष्ट प्रदेश डोळ्यासमोर ठेवून लिहलेले असते. त्यामुळे प्रादेशिक असे काही वेगळेपण जाणवत नाही. आणि कोणत्याही प्रदेशाचे चित्रण साहित्यात येते ते तेथल्या लोकजीवनाला बरोबर घेऊनच त्यामुळे शेवटी ते ग्रामीण असतेच. आनंद यादव म्हणतात, " प्रादेशिक हा शब्द वापरताना त्या त्या प्रदेशातील ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण कादंबरीच मानावी लागते " [15] आपल्या या मताला यादव दाखलाही देतात पण काही अभ्यासक आनंद यादवाचे हे मत विचारात घेत नाहीत. ते म्हणतात की बळजबरीने यादवांनी प्रादेशिक साहित्याला असे ग्रामीण साहित्यात बसवू नये उलट प्रादेशिक साहित्य हे विस्तृत व व्यापक आवाका असलेले साहित्य आहे.

प्रादेशिक साहित्य म्हणजे नेमके काय ? प्रादेशिक कादंबरी कशास म्हणावी या बद्दल विस्तृत व्याख्या करताना आनंद यादव म्हणतात " एखादया विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवन संकेत, रीती, समूहजीवनातील भाव-भावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाटय यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंब-या लिहल्या जातात. त्यांना प्रादेशिक कादंब-या म्हणता येईल" [16] प्रस्तुत व्याख्येतमुध्दा ग्रामीण समाज व वातावरण हाच मुख्य गाभा आहे. त्यामुळे प्रादेशिक साहित्य अशी वेगळी चूल मांडण्यापेक्षा या सर्वांना ग्रामीण साहित्यच म्हणावे असे यादव यांना वाटते.

अंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर यांनीही आपल्या ग्रंथात आनंद यादव यांच्या मताशी सहमती दर्शविली आहे.

ते म्हणतात " प्रादेशिकता म्हटली की ती ग्रामीण वाङ्.मयाला अपरिहार्यपणे जवळ येते. कारण प्रादेशिक म्हणून जी चित्रणे आजवर मराठीत आली आहेत ती सर्व ग्रामविषयक चित्रणे आहेत. म्हणूनच सर्व प्रादेशिक वाङ्.मयाला ग्रामीण या सदराखाली घेतले तरी त्यात फारशी चूक होणार नाही ".[१७] म्हणजे यांना सुध्दा प्रादेशिकता मान्य नसून ती ग्रामीणतेचेच एक अंग आहे असे वाटते. ग्रामीण साहित्याच्या निर्मितीच्या प्रेरणेच्या संदर्भात रा. ग. जाधव यांनी फार सखोल मत मांडले आहे " ग्रामीणता हा मराठी जीवनाचा सनातन अंगभूत घटक आहे व होता मराठी सारख्या जिवंत प्रगमनशील वाङ्.मयपरंपरेला या घटकाला संपूर्णपणे डावलणे केवळ अशक्य होते ".[१८] आणि त्यामुळेच ग्रामीण साहित्य जन्माला आले असे त्यांनी सूचवून त्याची निर्मिती होण्याची अपरिहार्यता व स्वाभाविकता सांगितली आहे. तर ना. सी. फडके म्हणतात. " प्रादेशिक कादंबरी अशी कादंबरीची स्वतंत्र त-हा मानण्याचे वास्तविक कारण नाही ग्रामीण साहित्याचीच ती एक शाखा आहे. शहरी जीवनाहून खेडयापाडयातल्या लोकांचे जीवन वेगळे आहे. आणि त्या जीवनाबद्दलही पुष्कळ लिहिण्यासारखं आहे. ही जी ग्रामीण कथेमागची भूमिका आहे तिच्याच बैठकीवरुन प्रादेशिक कादंबरी लिहली जावू लागली".[१९] ना. सी. फडके प्रादेशिक साहित्य व ग्रामीण साहित्य यांची प्रेरणा एकच आहे असे सांगतात व त्यांच्यात भेद मानायला ते तयार नाहीत तसेच प्रादेशिक साहित्य ही ग्रामीण साहित्याचीच एक शाखा आहे. या मुद्दयावर जोर देतात. ग्रामीण साहित्याच्या मागची प्रेरणा सांगताना म. ना. अदवंत म्हणतात " नागर जीवनात असलेला तोचतोचपणा हा कदाचित जानपदजीवनाचा लोकप्रियतेला कारणीभूत

झाला असेल. कदाचित खेडेगावात राहिलेले त्या जीवनाचा अगदी जवळून अनुभव घेतलेले व जीवनातील सुखदु:खाशी एकरूप झालेले लेखक आज साहित्यक्षेत्रात पुढे आलेले आहेत आणि म्हणूनच त्या जीवनाचे चित्रण अपरिहार्यपणे कथातून रंगवले जात आहे.[२०] या मतावरुन ग्रामीण साहित्याच्या निर्मितीच्या कारणावर प्रकाश पडतो मात्र ग्रामीण साहित्यातच प्रादेशिक साहित्य अंगभूत मानायचे की नाही याबाबत स्पष्ट कल्पना येत नाही.

मधू कुलकर्णी यांनी सुध्दा आनंद यादव यांच्या मताशी साम्य असणारे मत मांडले आहे परंतु त्यांनी कोणत्याही एका नावाचा आग्रह धरलेला नाही. " परिसर म्हणजेच प्रदेश हे मान्य होण्यास हरकत नाही. किंचितसा फरक मानायचाच झाला तर प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण संज्ञेपेक्षा व्यापक आहे.[२१] त्यांना असे वाटते की या दोन्ही संज्ञा एकच आहेत फक्त फरक थोडा असलेल्या व्यापकतेचा आहे. तर गं. ना. जोगळेकर म्हणतात " महाराष्ट्रासारख्या मोठा भूप्रदेश अनेक उपभूप्रदेशामध्ये विभागला गेला आहे. त्यामुळेच कोकण, द. महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र खानदेश, माणदेश, बागलाण, विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्राचा पूर्वभाग किंवा गोंडवन असे भौगोलिकदृष्टया पुष्कळ विभाग पडतात. या प्रदेशातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवन आचारविचार आणि परंपरा वेगळया आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये असलेले आदिवासींचे जीवन त्याहून वेगळे आहे हे सर्व लक्षात न घेता प्रादेशिक जीवन म्हणजे ग्रामीण जीवन असे समीकरण मांडणे विसंगत ठरते.[२२] तर नागनाथ कोत्तापल्ले हे मात्र आपल्या विस्तृत विवेचनात ग्रामीण व प्रादेशिक या दोन संज्ञा दोन भिन्न मानतात ते म्हणतात " प्रादेशिकतेचे

ग्रामीणत्वाशी निश्चितच काही बाबतीत साम्य असते. परंतु या दोन्ही संज्ञांनी निर्देशित होणारा अर्थही सारखाच असतो असेही नाही ते अर्थ परस्पर समांतर आहेत परंतु एक नव्हेत कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून ."[23] म्हणजेच ग्रामीण व प्रादेशिक साहित्यात प्रगट होणाऱ्या घटकात साम्य असले तरी त्यांच्या आविष्कारात मात्र साम्य नसते.

याप्रमाणे आपण " ग्रामीण साहित्य " ही संज्ञा मानायची की प्रादेशिक साहित्य ही संज्ञा मानायची याबद्दल चर्चा केली. ही चर्चा करत असतानाच ग्रामीण साहित्याचे स्वरूप, त्याची वैशिष्टये आणि ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागच्या प्रेरणा काय आहेत याचीही विस्तृत चर्चा केली. ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य याबद्दल अभ्यासकात एकमत दिसत नाही. त्यामुळे या प्रश्नाची उकल होत नाही. आता आपण ग्रामीण कादंबरीच्या खाणाखुणा आणि तिची वाटचाल या संदर्भात चर्चा करणार आहोत.

## ग्रामीण कादंबरीची वाटचाल :

मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रारंभापासून ते आजपर्यंत ग्रामीण कादंबरीची वाटचाल कशी झाली याचा आपण विचार करणार आहोत .

" पिराजी पाटील " ही रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची कादंबरी पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानली जाते. इ. स. १९०३ मध्ये ती प्रकाशित झाली. मराठी ग्रामीण कादंबरीच्या उगमापासून म्हणजेच १९०३ पासून आजपर्यंत तीने अनेक चढउतार पाहिले आहेत. आज स्वतंत्र प्रवाह निर्माण झाल्याचे दिसून येते. ग्रामीण कादंबरी या नावाखाली नवनवीन लोक लेखन करत आहेत. अशा या ग्रामीण कादंबरीच्या उगमापासूनचा प्रवास याचा विचार आपल्याला करावयाचा आहे. महात्मा जोतीराव फुले, रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी, कृष्णराव भालेकर ना. वि. कुलकर्णी, ग. रा. वाळिंबे उर्फ रामतनय, साने गुरूजी र. वा. दिघे श्री. रघुनाथ, ग. ल. ठोकळ, विभावरी शिरुरकर, श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, गो. नी. दांडेकर, रणजित देसाई, आण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, महादेव मोरे, रा. रं. बोराडे, आनंद यादव, आनंद पाटील, पुरुषोत्तम बोरकर, हे ग्रामीण कादंबरीकार महत्त्वाचे आहेत. यामुळे त्यांच्या वाङ्‌मयाच्या आधारे ग्रामीण कादंबरीची वाटचाल पाहणार आहोत.

महात्मा जोतीराव फुले यांच्या " शेतक-याचा आसूड " या पुस्तकासंबंधी विश्वकोशामध्ये माहिती खालीलप्रमाणे मिळते. " श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र " शेतक-यांचा आसूड " या विस्तृत निबंधामध्ये फुले यांनी रेखाटले आहे. ... या निबंधामध्ये भारतीय ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग ब्रिटीश साम्राज्य-शाहीच्या आर्थिक धोरणाने कसे ढासळले आहेत. याचे हृदयविदारक वर्णन केलेले आहे." [२४] म्हणजे पुस्तकाचा उल्लेख एक विस्तृत निबंध असा केलेला आहे पण या पुस्तकातली भाषा ललितपूर्ण असून सामाजिक

वास्तवाचे उत्कृष्ट चित्रण करण्यात आले आहे. समकालीन समाजाचे आहे तसे जिवंत चित्रण करणाऱ्या फुल्यांना कादंबरी लिहायची नव्हती परंतु सामाजिक वास्तवाशी इमान राखल्यामुळे त्यांच्या लेखनात कादंबरीचे गुण उतरले आहेत. " शेतकऱ्याचा आसूड " संबंधी स. ग. मालशे म्हणतात " शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीनदीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे ते एखादया ग्रामीण वास्तववादी कादंबरीना लाजवील इतके प्रत्ययकारी आहे.[२५]

यानंतर कृष्णराव भालेकर यांच्या बळीबा पाटील या कादंबरीचा विचार करावा लागतो. बळीबा पाटील या कादंबरीचे मूळ शीर्षक " बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ " असे असून कादंबरीच्या शेवटी लेखकाने जीवन सार्थकी लावण्यासंदर्भात काही उपदेशपर विवेचन केले आहे. म. फुले यांच्या सत्यधर्मास अनुसरुन केलेले हे विवेचन संवादरुप आहे. बळीबा पाटील ही कादंबरी " दीनबंधू " मधून १८८८ ला प्रसिध्द झाली. " कृष्णराव भालेकर : समग्र वाड्.मय" या ग्रंथाचे संपादक सीताराम रायकर म्हणतात ( प्रकाशक, महात्मा फुले समता प्रतिष्ठान ) भालेकरानी आपल्या शेतकऱ्यांच्या स्थिती - विषयीचे त्यांची दुःखे दूर करण्यासाठी काय केले पाहिजे याविषयीचे विचार मांडण्यासाठी पात्रे, संवाद, प्रसंग व ग्रामीण पार्श्वभूमी वापरुन प्रचारकी हेतू प्रधान मानून लिहलेली ही कादंबरी आहे. कदाचित हे लेखन कादंबरी म्हणून झाले नसण्याची शक्यता आहे. म्हणून मजकुराचा ऐवज कादंबरी एवढा नसल्यामुळे " बळीबा पाटील " ही कादंबरी मानता येणार नाही.[२६] म्हणूनच त्यांच्या विधानामुळे मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान आपोआपच धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकर यांनी १९०३ मध्ये प्रकाशित केलेल्या " पिराजी पाटील" या कादंबरीला मिळतो.

त्याकाळातील ग्रामजीवन गावातील काम करणाऱ्या लोकांचे एकमेकांशी असलेले संबंध शहरातील नोकरदारांची शेतकऱ्यांकडे पाहण्याची अयोग्य व तुच्छतावादी दृष्टी सरकारी अधिकाऱ्यांची लाचखोरी, सरकार आपल्यासाठी काहीच करत नाही याविषयी शेतकऱ्यांमध्ये असलेली चीड इ. अनेक सामाजिक वास्तवाचे भान ठेवून लिहलेल्या बाबी या कादंबरीत येऊन जातात. दुष्काळामुळे कफल्लक झालेला पिराजी पाटील आपल्या संसाराची व इतर शेतकऱ्याची कशी वाताहात झाली याची कहाणी सांगतो व तिच कहाणी लेखक आपल्या शब्दात पुनःकथित करतो. धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकरांनी " " वाईकर भटजी " ( १८९८ ) आणि " पिराजी पाटील " ( १९०३ ) या कादंबऱ्या लिहल्या. वाईकर भटजी या कादंबरीच्या तुलनेने " पिराजी पाटील " या कादंबरीला जास्त लोकप्रियता मिळाली नाही. सगळा गाव दुष्काळाच्या खाईत लोटला आहे. पिराजी गावचा पाटील असल्यामुळे पालकत्वाच्या जाणिवेने तो गावच्या भुकेल्या लोकांच्या तोंडात अन्न घालण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याचे प्रयत्न अपुरे पडतात दुष्काळ लांबतो शेवटी लोक गावाचा त्याग करायला लागतात एक वेळच्या जेवणासाठी व अन्नासाठी धर्मांतर करु लागतात. गावाची सगळी वाताहात होते. असे जिवंत चित्रण या कादंबरीत आहे.

आनंद यादव आपल्या " ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव" या ग्रंथात हया कादंबरीची उपेक्षा का झाली असावी या संदर्भात म्हणतात " शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या नोकरदार वर्गात त्या काळी प्रामुख्याने ब्राह्मणच असल्याने व त्यांच्या स्वार्थी व क्षुद्र वृत्तीचे परखड दर्शन धनुर्धारींनी कादंबरीत घडविले असल्यामुळे कदाचित तिच्याकडे तत्कालीन जाणकारांचे वाचकांचे, समीक्षकांचे विद्यापीठात

पुस्तके लावणा-या विद्वानांचे दुर्लक्ष झाले असण्याची शक्यता आहे. तो काळ लक्षात घेता हे कारण नाकारता येणे कठीण जाते .[२७]

ना. वि. कुलकर्णी हे एक मराठी ग्रामीण कादंबरीकार होत. ज्यावेळेस मराठी कादंबरीमध्ये रंजनवादाचे युग होते त्यावेळेस ना. वि. कुलकर्णी यांनी ग्रामीण जीवनावर आधारीत कादंबरी लिहण्याचे धाडस केले. त्यामुळेच त्यांना शेतूत दृष्टीचे कादंबरीकार म्हणून संबोधले जाते. समाजातील कष्टकरी लोकांच्या जीवनाचे चित्रण करण्याचा ध्यास त्यांनी घेतला होता त्यामुळे ग्रामीण कादंबरीला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो. कामगार जीवनाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी " मजूर " ही कादंबरी लिहली तर ग्रामजीवनाशी इमान राखून त्यांच्या समस्या मांडण्यासाठी कसे दिवस जातील ( १९२५) " शिपाई " ( १९२५) " माणिक " ( १९३१) " न्याय " ( १९२६) " संसारात कष्टी वडील " ( १९३०) या कादंब-या लिहल्या. ना. सी. फडके यांच्या लोकप्रियतेच्या काळात वेगळेपण जोपासण्याचा प्रयत्न ना. वि. कुलकर्णी यांनी केला. फडके यांच्या प्रभावातून श्रेष्ठ कादंबरीकार वि. स. खांडेकर सुध्दा सुटले नाहीत. त्यामुळे त्यावेळेस अशी वेगळी वाट चोखाळण्याचे धाडस ना. वि. कुलकर्णी यांनी केलेले दिसते हे प्रशंसनीय आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत गांधीयुगाचा आरंभ झाला. गांधीजीनी " खेडयाकडे चला " हा मंत्र दिला त्यामुळे गांधीजीच्या तत्त्वज्ञानाने भारावून अनेक लेखकांनी ग्रामीण जीवनावर कादंब-या लिहल्या. वा. म. जोशी, वि. स. खांडेकर, मामा वरेरकर हे लेखक गांधी तत्त्वज्ञानाने प्रेरित होऊन ग्रामीण साहित्याकडे वळले म्हणूनच त्यांच्या साहित्यात ग्रामजीवनाचे चित्रण वरवरचे आहे. अस्सल मातीचा सुगंध त्यांच्या साहित्याला नाही. साने गुरूजी हे जरी गांधी तत्त्वज्ञानाने प्रेरीत झालेले असले तरी त्यांनी ग्रामीण

साहित्याचे वरवरचे चित्रण केले नाही हे त्यांच्या " श्यामची आई " या पुस्तकावरुन स्पष्ट होते. कोकणातील अस्सल ग्रामीण-त्वाच्या खाणाखुणा या पुस्तकात जागोजागी विखुरल्या आहेत.

ग्रामीण कादंबरीच्या विश्वात र. वा. दिघे यांचे नाव ठळकपणे रेखले आहे. ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत ग्रामीण कादंबरीला निसर्गाच्या अगदी जवळ पोहचविण्याचे काम दिघे यांनी केले. निसर्गाच्या विविध रुपातच ग्रामजीवन घडत असते आणि फुलत असते याचे प्रत्ययकारी चित्रण र. वा. दिघे यांच्या कादंब-यात आढळते. ज्यावेळेस ना. सी. फडके यांना मुजरा करायचा काळ होता त्यावेळेस दिघे स्वतः च्या वेगळ्या शैलीने कोकणातील निसर्ग, ग्रामजीवन याचे सौंदर्य आपल्या लेखनीने कादंबरीत उतरवीत होते. या संदर्भात बोलताना ते एके ठिकाणी म्हणतात " महाराष्ट्राचे खरेखुरे देखावे, त्यातील ख-या व्यक्ती आम्हाला रेखाटावयाच्या आहेत. आमच्या खेडेगावातील प्रणय हा असा आहे की फाडल्या-शिवाय निघत नाही ".[२८] दिघे यांनी ग्रामीण जीवनातील लोकांच्या व्यक्तींच्या अनेक जिकिरीच्या प्रसंगांच्या वेळच्या त्यांच्या भावजीवनाचे चित्रण कादंबरीत केलेले आढळते. र. वा. दिघे यांनी " पाणकळा" " सराई " " आई आहे शेतात " " पड रे पाण्या ", " कार्तिका" या महत्त्वाच्या ग्रामीण कादंब-या लिहल्या. त्यांनी आपल्या कादंब-यात कुठेही प्रादेशिक हा शब्द वापरला नाही पण समीक्षकांनी त्यांना प्रादेशिक ठरवले.

याच काळात ग. रा. वाळिंबे ( रामतनय ) " मोहित्याची मंजुळा " ( १९३१ ) " खरा उद्धार " ( १९३६ )" साखर गोष्टी " ( १९४४ )" प्रमिलाबेन" ( १९४७ ) व " गजाभाऊ " या कादंब-या लिहिल्या तर वि. वा. हडप यांनी आपल्या काही कादंब-यातून ग्रामीण

जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण केले रा. शा. पाटील यांनी " सीता " ( १९३१) ही कादंबरी लिहून ग्रामीण भागाचा कायापालट कसा करता येईल याबद्दल मत मांडले आहे. ना. ह. आपटे, दा. न. शिखरे या सर्वांनी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत मोलाची भर घालण्याइतपत लेखन केलेले आढळते. ग्रामीण साहित्याच्या या पडझडीच्या काळातच " प्रादेशिक साहित्य " या नवीन पोटप्रकाराचा जन्म झाला. वि. स. सुखटणकरांच्या " सह्याद्रीच्या पायथ्याशी " या कथासंग्रहाच्या निमित्ताने या प्रवाहाचा उगम झाला ( १९३१) या प्रवाहाला स्वतंत्र मानायचे की नाही याची चर्चा आपण सुरुवातीला केलीच आहे.

र. वा. दिघे यांनी निर्माण केलेल्या पायवाटेमुळेच पुढे ग. ल. ठोकळ यांच्यासारखा लेखक ग्रामीण साहित्य धाडसाने लिहू लागला. ग. ल. ठोकळ यांची " गावगुंड " आणि र. वा. दिघे यांची " पाणकळा" या कादंबऱ्यात खूपच साम्य आढळते. कुसुमावती देशपांडे म्हणतात, " व्यक्तिचित्राची निवड, उत्कट भावनांच्या चित्रणांची आवड, ग्रामजीवनाची ओळख व रानवट जीवनाच्या वर्णनाकडील ओढ या विशेषांत ठोकळ व दिघे यांच्यामध्ये बरेच साम्य आहे .[२९] गावगुंडचे वातावरण थोडे ग्रामीण थोडे पांढरपेशी आहे. अत्यंत नेटकी, आटोपशीर आणि देखणी बांधणीची ही कादंबरी ठोकळांनी घडवलेली दिसते. ग्रामीण वातावरणातील मनोरंजनयुक्त असे लिखाण ठोकळांनी केलेले दिसते. मनोरंजनासाठी नवा बदल हीच त्यांची प्रेरणा दिसून येते. म्हणून एके ठिकाणी आनंद यादव म्हणतात " ग्रामीण साहित्याचे " हरिभाऊ " श्री. म. माटे हे मानले गेले तर ग. ल. ठोकळ यांना फडके मानले पाहिजे .[30]

विभावरी शिरुरकर यांनी १९५० च्या सुमारास ग्रामीण वाङ्‌मयाला खराखुरा प्रारंभ त्यांच्या " बळी " या कादंबरीने करून दिला. याचवेळेस मराठी कादंबरीत नवचैतन्य दिसून येऊ लागले. याच नव्या जाणिवेचा स्पष्ट अविष्कार विभावरी शिरुरकरांच्या कादंबरीतून दिसून येतो. हरिजन लोकांच्या पलीकडे असलेल्या चोरट्या जमातीच्या जीवनातील प्रखर वास्तव अतिशय प्रभावीपणे या कादंबरीत आले आहे तत्कालीन प्रस्थापित समाजाला जोरदार धक्का देऊन ही कादंबरी उभी आहे. " हिंदोळ्यावर " ( १९३४ ) " विरलेले स्वप्न " ( १९३५) या कादंब-यातून स्त्रियांच्या वेदनेला वाचा फोडून विभावरीनी बळी या कादंबरीत गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांग, गारुडी समाजाच्या जीवनाची शोकात्मिका अत्यंत प्रत्ययकारी शब्दात प्रगट केली आहे.

१९४५ ते १९५० च्या आसपास श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांनी ग्रामीण जीवनावरील कथा-कादंब-या लक्ष वेधतील अशा पध्दतीने लिहल्या. त्यांच्या एकूणच साहित्याच्या संदर्भात आनंद यादव म्हणतात, " त्यांच्या साहित्याला त्यांच्या विशिष्ट ग्रामप्रदेशातील वास्तवाची भक्कम बैठक दिसते. ग्रामीण जीवनाचा अनुभव त्यांच्या साहित्यातून समृध्दपणे आविष्कृत होतो" [३१] श्री. ना. पेंडसे यांनी कोकणच्या निसर्गसुंदर रांगड्या पार्श्वभूमीवरच आपल्या सुरेख कादंब-या लिहल्या व कोकणच्या जीवन वैशिष्टयांना अप्रतिमपणे साकार केले. " हद्दपार " " एल्गार " " गारंबीचा बापू " " हत्या " या सुरुवातीच्या कादंब-यातील पात्राची कर्मभूमी म्हणजे " हर्णै " बंदराच्या परिसरातील उत्तर कोकणचा प्रदेश हा विशिष्ट प्रदेश त्यांनी आपल्या कादंब-यातून चित्रीत केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली. नंतरच्या कलंदर ( १९५९)व रथचक्र ( १९६२ ) या कादंब-यातून ग्रामीण जीवनाचे तेथील लोकांचे भावजीवन, परस्पर संबंध याचे

प्रभावशाली चित्रण केले आहे.

विविध स्वरूपाची साहित्य निर्मिती करणारे लेखक म्हणून गो. नी. दांडेकर प्रसिद्ध आहेत " शितू " (१९५३) " तुटलेले घरकूल " ( १९४८) पडघवली ( १९५५) पवनकाठचा धोंडी ( १९५५), माचीवरला बुधा ( १९५८) जैत रे जैत ( १९६५) रानभुली ( १९७८) अशा अनेक निसर्ग वर्णनाने ओतप्रोत भरलेल्या कादंबऱ्या लिहल्या. त्यांच्या काही कादंबऱ्यातून निसर्ग व ग्रामीण वातावरणाच्या जोडीला इतिहास गुंफला आला आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली समाजव्यवस्था उद्ध्वस्त होते आहे म्हणून ते " पडघवली " मध्ये व्यथीत होतात. तर " माचीवरला बुधा " या कादंबरीतून बुधाचे मातीशी, सृष्टीशी, भोवतालच्या प्राणीजीवनाशी जे अतूट नाते जडले आहे त्याचे प्रत्ययकारी चित्रण दांडेकर करतात.

कथेच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण रचना करणारे आणि नवकथेच्या माध्यमातून मराठी कथेला वेगळे वळण देणारे व्यंकटेश माडगूळकर हे अग्रणी कादंबरी लेखक आहेत. " पुढचं पाऊल " ( १९५० ) " बनगरवाडी " ( १९५५), वावटळ ( १९६४) कोवळे दिवस ( १९७९) आणि " करुणाष्टक " ( १९८२ ) अशा त्यांच्या एकूण कादंबऱ्या आहेत. " बनगरवाडी " ही कादंबरी एवढी वेगळी होती की तोपर्यंतच्या कोणत्याच ग्रामीण कादंबरीशी तिची परंपरा दाखवून देता येत नव्हती तिने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. बनगरवाडी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात मैलाचा दगड ठरली. माणदेशाचा रुक्ष निसर्ग, तिथल्या हाडा-साच्या रांगड्या माणसाच्या जीवनाचे चित्रण अतिशय जिवंत भाषेत या कादंबरीतून प्रगट होते त्यांच्या इतर कादंबऱ्या आत्म-चरित्रात्मक असून त्यातही ग्रामीण परिसरातील अनेक बाबी प्रत्ययकारी चित्रीत केल्या आहेत.

यानंतरच्या कालखंडात स्वतःच्या लेखणीने ग्रामीण कादंबरीत वेगळे स्थान निर्माण करणारे आण्णाभाऊ साठे यांचा विचार करुनच पुढे जावे लागते. आज जरी आपण त्यांना दलित लेखक म्हणत असू तरी ते नेहमी स्वतःला ग्रामीण लेखक म्हणवून घेत असत व त्यांच्या कादंबऱ्याचे स्वरूप पाहता त्यांना ग्रामीण कादंबरीकार म्हणणेच योग्य ठरेल. गावोगावच्या घराण्यांच्या आपसातील वैराच्या कहाण्या हा त्यांच्या कादंबऱ्यांचा विषय आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यामध्ये संघर्ष आणि त्यातून येणारी नाटयात्मकता यामुळे याला प्राधान्य आहे. देखणी नायक-नायिका, प्रणयवर्णने, रहस्यमयता आणि योगायोग असे रंजनयुक्त घटकही आढळतात तरीही रंजनाच्या पुढे जावून वारणेच्या खो-यातील लोकांची मानसिकता आणि तेथील निसर्ग, एकमेकांशी असलेले भावनिक संबंध व त्यातून प्रकटणारी ग्रामीणता याचे सर्वांगसुंदर चित्रण त्यांच्या कादंबऱ्यातून प्रगट होते. " फकिरा " सारखी कादंबरी तर ग्रामीण लोकमानसाचे भावविश्व सांगणारी उत्कृष्ट व लोकप्रिय कादंबरी ठरली आहे.

" धग " ( १९६०) ही उद्धव शेळके यांची कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत उल्लेखनीय आहे. तो पर्यंतच्या ग्रामीण कादंबरीच्या तंत्राची अनेक बंधने झुगारून तिने वास्तवाशी जवळचे नाते सांगितले आहे. " धग " विषयी म. सु. पाटील म्हणतात, " धग ही कठोर वास्तवाचे कलात्मक रूप अविष्कृत करणारी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येइल ".[३२] धगच्या भाषाशैली संदर्भात डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात " धग मधील ग्रामीण अनुभवविश्वाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे या

कादंबरीची भाषा, निवेदन प्रमाणभाषेतून असले तरी संवादातून अर्थवाही अशा ग्रामीण बोलीभाषेचे उपयोजन लेखकाने केले आहे .[३१] " बाई विना बुवा " ( १९६३) व डाळिंबाचे दाणे ( १९७७) या त्यांच्या इतर कादंब-या होत. रणजित देसाई हे जरी ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून परिचित असले तरी आपल्या साहित्य लेखनाचा आरंभ त्यांनी " बारी " ( १९५९ ) " माझा गाव " ( १९६०) " समिधा " ( १९७९) या कादंब-या लिहून ग्रामीण वास्तवाचा अविष्कार घडविला होता.

शंकर पाटील हे ग्रामीण कथालेखक म्हणून लोकप्रिय आहेत परंतु त्यांनी संपूर्णतः ग्रामीण मानसिकतेचा अविष्कार असलेले चित्रण करुन " टारफुला " ( १९६४) ही कादंबरी लिहली. कादंबरी रचनेचे रुढ संकेत बदलून जीवनानुभवाची मांडणी या कादंबरीत झाली आहे. कोणतीही एक मध्यवर्ती व्यक्तिरेखा या कादंबरीत नसून गावातील सत्तासंघर्ष आणि ग्रामीण रिती-रिवाज यांचे चित्रण आहे. हमीद दलवाई यांची " इंधन " ( १९६५) ही सामाजिक वास्तवाबद्दल जाण येण्यासाठी लिहलेली विचारप्रेरक कादंबरी आहे. या कादंबरीने स्वातंत्र्यानंतरही समाजात हिंदू-मुस्लिम यांचे संबंध किती तणावपूर्ण आहेत हे अचूक टिपले आहे व लेखकाची मनोवृत्ती पूर्णपणे तटस्थ असल्याने अत्यंत संयमी चित्रण झालेले आहे. जयवंत दळवी यांच्या " सारे प्रवासी घडीचे " (१९६४) या कादंबरीतून बालपणीच्या आठवणींच्या माध्यमातून एक संपूर्ण खेडे उभा केले असून अतिशय विनोदी शैलीतून कोकणातील बेरकी मानवसमूह उभा केला आहे. " महानंदा " ( १९७० ) मधून भाविणीच्या मुलीची परवड चित्रित होते तर " धर्मानंद " ( १९८०) मधून उद्ध्वस्त कुटुंबाची कहाणी रेखाटली आहे. चि. त्र्यं. खानोलकरांनी काव्य, नाट्य याबरोबरच " रात्र काळी घागर

काळी ", " अगोचर, कोंडूरा असा कादंब-यातून ग्रामीण कोकणी अनुभवविश्व साकारले आहे.

साठनंतरच्या ग्रामीण कादंबरीत आपली वेगळीच छाप पाडणारे रा. रं. बोराडे यांची पाचोळा ( १९७१) ही लक्षणीय कादंबरी आहे. मराठवाडयातील ग्रामीण कादंबरीकारां――मध्ये विचार करतांना त्याच्या कामगिरीचा स्वतंत्रपणे आणि सविस्तर चर्चा करणार आहोतच.

पाचोळा आणि गोतावळा या एकाच वर्षी ( १९७१) प्रसिध्द झालेल्या कादंब-या आहेत. " गोतावळा" पूर्वी आनंद यादव कथाकार म्हणून स्थिर झालेच होते. कृषीजीवनावर यंत्रयुगाचा काय परिणाम झाला हे अनुभवलेले सत्य त्यांच्या या कादंबरीतून व्यक्त झाले आहे. या कादंबरीविषयी र. बा. मंचरकर म्हणतात " " कृषिकेंद्रित वास्तव हा ग्रामीण भावविश्वाचा गाभा असल कलात्मकतेने व बोलीच्या लयीने अविष्कृत करणारी ही अव्वल दर्जाची कादंबरी आहे." [३४] तमाशाच्या वेडापायी स्वत:चे जीवन बरबाद झालेल्या गुणा या ग्रामीण कलावंताची कहाणी यादवांनी " नटरंग " ( १९८०) या कादंबरीत चित्रित केली आहे तर " झोंबी व नांगरणी " या आत्मचरित्रात्मक कादंब-या आहेत. ना धो. महानोर यांची " गांधारी " ही पण उल्लेखनीय कादंबरी आहे तर चंद्रकुमार नलगे यांनी " आगीन फूल " ( १९७४), " गस्त " ( १९७६) " देवाची साक्ष " ( १९७९) इ. कादंब-या लिहल्या.

कथेबरोबरच कादंबरीमध्ये सुध्दा आपल्या लेखनाचा लक्षणीय ठसा उमटवणारे महत्वपूर्ण लेखक म्हणजे महादेव मोरे हे होत. " पाटहणा" ( १९६६) " एकोणिसावी जात " ( १९६८) " पनोती " ( १९६९) " रैत " ( १९७१) " वस्ती " ( १९७५ )

" लाईन " ( १९८०) " झळा " ( १९९०) इ. त्यांच्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. अजूनही त्यांचे लेखनकार्य चालूच आहे. ग्रामीण जीवनातील लोकांचे स्वभाव, दुःख, दारिद्र्य, एकमेकांशी असलेले परस्पर संबंध, दुसऱ्याकडे पाहण्याचे दृष्टिकोण, या संबंधी प्रत्ययकारी जिवंत चित्रण त्यांच्या कादंबरीतून येते. नागरजीवनाच्या बाहेरील शेतमजूर विडीकामगार, ड्रायव्हर, क्लिनर, वेश्या-दलाल, जोगतिनी, जोगते अशा तळागाळातील लोकांचे आणि मांग-गारूडी-डोंबारी अशा गावकुसाबाहेरील लोकांच्या व्यथांचे चित्रण मोरे यांच्या कादंबरीत येते. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत सुध्दा त्यांची लेखणी लिखाण करते आहे, हे प्रशंसनीय आहे.

१९७५ नंतरच्या काळात " कागुद " आणि " सावली " ( १९८६) या दोन लघुकादंबऱ्या लिहणारे आनंद पाटील हे लक्षणीय कादंबरीकार आहेत. एखादे शेत विकत घेत असताना खरेदीखत करताना शेतकऱ्यांना किती अडचणीला तोंड दयावे लागते याचे वास्तव चित्रण " कागुद " मध्ये आहे तर घर बांधण्याच्या व्यापात खेडयातल्या गरीब कुटुंबाला किती त्रास सोसावा लागतो याचे चित्रण " सावली " मध्ये आहे. त्यामुळे दोन्ही लघुकादंबऱ्यांचा जीवनानुभव अस्सल ग्रामीण आहे. पुरूषोत्तम बोरकर यांची " मेड इन इंडिया " ( १९८७) ही पहिलीच कादंबरी तिच्या वेगळेपणामुळे गाजली. रवींद्र ठाकूर म्हणतात, " आपल्या भोवतीच्या समाजाकडे, माणसाकडे आणि स्वतःकडे मिश्किलपणे पहात ग्रामीण भागात जीवनमूल्यांची कशी पडझड होत चालली आहे आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेत एकूणच ग्रामीण जीवन कसे प्रदूषित होत चालले आहे याचे वर्णन पंजाबराव करीत जातो." [३५]

विकृतीकडे वाटचाल करणा-या ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडवणारी ही कादंबरी आहे.

बाबाराव मुसळे यांची " हाल्या हाल्या दुध दे " ( १९८५) व अशोक व्हटकर यांच्या " मेलेलं पाणी, आणि बगाड "( १९८४) अशा कादंब-या लिहून ग्रामजीवनाचे एक वेगळे रूप वाचकासमोर ठेवले आहे. नागनाथ कोत्तापल्ले व वासुदेव मुलाटे हे सुध्दा ग्रामीण साहित्यातील महत्वाचे लेखक आहेत, त्यांचा स्वतंत्रपणे पुढे आपण विचार करणारच आहोत. राजन गवस यांनी " चौंडक " ( १९८५) आणि "भंडारभोग "( १९८८ ) या कादंब-या लिहून जोगतीण आणि जोगत्या यांच्या लाजीरवाण्या जगण्यावर प्रकाश टाकला. समाजातल्या उपेक्षित स्तरातील माणसाचे जीवन किती भयानक आहे या विषयी वाचकाला चिंतनप्रवृत्त करणे हेच या कादंब-याचे यश आहे.

आतापर्यंतच्या विस्तृत विवेचनातून आपण ग्रामीण कादंबरीची वाटचाल पाहिली एकूणच मराठी कादंबरीमध्ये ग्रामीण कादंबरीच्या खाणाखुणा आहेत. तिच्या वाटचालीच्या प्रेरणा कशा आहेत. याचे स्वरूपही आपण अनेक अभ्यासकांच्या मतांच्या आधारे पाहिले. पुढच्या प्रकरणाकडे वळण्याआधी या प्रकरणाच्या शेवटी आपण मराठवाडयातील ग्रामीण कादंबरीचा उहापोह करणार आहोत.

## मराठवाडयातील ग्रामीण कादंबरी :

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हा दीर्घकाळापर्यंत निजामी राजवटीखाली होता. त्या राजवटीने हेतुत: मराठवाडयाचे मागासलेपण जोपासले त्यामुळे शैक्षणिक सुधारणा व इतर सुधारणांच्या बाबतीत मराठवाडा खूप मागे राहिला त्यामुळे साहित्य निर्मितीत पोषक

वातावरण मराठवाड्यात निर्माण झाले नाही. भाषेच्या आधारावर महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला आणि विकासाचा वेग थोडासा वाढला आणि हळूहळू साहित्यनिर्मिती होऊ लागली जरी पोषक वातावरण नसले तरी आधुनिक मराठी वाङ्मयात भर टाकणारे समर्थ लेखनही मराठवाड्यातच झाले आहे हे मान्य करावेच लागेल. या सर्वांचा मागोवा घेण्यासाठी मराठवाड्यातील प्रमुख, ग्रामीण कादंब-यांचा आणि कादंबरीकाराचा आढावा आपणाला घ्यावा लागेल.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर ग्रामीण लेखन करुन मराठवाड्यातील निसर्गाला आणि ग्रामिणातेला जिवंतपणा आणण्याचे काम बी. रघुनाथ यांनी केले. निजामी राजवटीत चिरडल्या जाणा-या सामान्य लोकांचे जीवन त्यांनी आपल्या कादंबरीतून चित्रित केले. देशकार्यासाठी स्वत:ला वाहून घेणा-या ग्रामीण तरुणाची कथा " बाबू दडके " ( १९४४) या कादंबरीत येते. त्यांनी " म्हणे लढाई संपली " ( १९४६), "आडगावचे चौधरी" ( १९५४ ), " जगाला कळलं पाहिजे " इ. कादंब-या लिहल्या मराठवाड्यातल्या सुलतानी कारकिर्दीत सामान्य जनतेवर चौधरी-सारखे जुलमी जहागीरदार कसे अन्याय करत होते याचे वर्णन "आडगावचे चौधरी" या कादंबरीत येते. निर्दय राजकारण करुन प्रतिष्ठा संभाळण्यासाठी वाममार्गाने पैसा मिळवणे व सामान्य जनतेला अन्यायाने भरडून काढणे या कथा, कादंबरीत वरवाडा, उदयास्त, आणि चौघड्याचे हाड " या तीन भागात येतात. मराठवाड्यातील लोकांच्या सरंजामशाही वृत्तीचे मनोवेधक चित्रण या कादंबरीत येते तर युध्दकाळातील टंचाईच्या परिस्थितीत सामान्य माणसाचे कसे शोषण होत होते याचे चित्रण " म्हणे लढाई संपली " या कादंबरीत येते. मराठवाड्यातील माणसाच्या भाव-

भावनांचे तेथील वृत्तीप्रवृत्तीचे वर्णन ग्रामीणतेने बी. रघुनाथ यांनी केलेले आढळते.

श्री. बी. रघुनाथांच्या नंतर ज्यांच्या लेखणीला ग्रामीण परिसर भावला असे अग्रगण्य ग्रामीण कादंबरीकार प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी सुध्दा अत्यंत दर्जेदार लेखन केले आहे. १९७१ साली प्रसिध्द झालेली त्यांची " पाचोळा " ही ग्रामीण बोलीभाषेतील पहिली कादंबरी आहे. शहरीकरणामुळे अधोगतीस पोहचलेल्या गंगाराम शिंपी व त्याची बायको पारवती आणि त्यांचे कुटुंब यांची शोककथा या कादंबरीत त्यांनी अत्यंत समर्थपणे लिहली आहे. ग्रामीण शब्द म्हणी,वाक्प्रचारांचा वापर, ग्रामीण जीवनातील कल्पनांचा वापर याद्वारे लातूर उस्मानाबादकडील खास ग्रामीण वातावरण यांच्या कथा कादंब-यातून येते या कादंबरीबद्दल शांता शेळके म्हणतात " तिचे सौंदर्य व सामर्थ्य तिच्या अकृत्रीम साधेपणात आणि कलात्म सच्चेपणात आहे.[३६] १९८७ मध्ये त्यांची " सावट " ही दुसरी कादंबरी प्रसिध्द झाली. उच्चशिक्षणामुळे ग्रामीण परिसरात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या प्रश्नांची हाताळणी करुन त्यांनी ही कादंबरी लिहली आहे. मुले उच्चशिक्षित तर झाली परंतु मुली कमी शिकल्यामुळे मनाजोगती मुलगी मिळत नाही अशी ज्वलंत समस्या त्यांनी या कादंबरीतून मांडली आहे.
" चारापाणी " ( १९८९) ही मराठवाडयातील दुष्काळावर आधारीत कादंबरी लिहली आहे. निसगाच्या कृपेवर आधारीत असलेला शेतकरी पाऊसपडला नाहीतर कसा हवालदिल होतो याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत येते तर ग्रामीण परिसरातील लोकांच्या नसानसात राजकारणाची हवा कशी

भरली आहे याचे चित्रण त्यांच्या " आमदार सौभाग्यवती " या कादंबरीत आहे. प्रत्येक कादंबरीतून ग्रामीण वातावरणातील वेगळा विषय हाताळला असला तरी " पाचोळा" मुळे निर्माण झालेले त्यांचे स्थान अबाधीत आहे.

ग्रामीण संवेदनशीलतेचा आणि निसर्गाचा स्पर्श लागलेल्या " रानातल्या कविता" लिहून लोकप्रिय झालेले कवी ना. धों. महानोर यांची १९७३ साली " गांधारी " ही कादंबरी प्रसिध्द झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात रझाकार आणि नंतर जयदेवसारख्या गावठी पुढा-यांच्या दडपणाखाली भरडून निघालेल्या खेड्याचे वास्तवाच्या खाणाखुणा जागोजागी या कादंबरीत आढळतात. देवाचे अस्तित्व नाकारणारा बुध्दिवाद आणि श्रध्दा या दोहोत आजच्या माणसाची होणारी मानसिक यातायात " दूर गेलेले घर " ( १९७०) या कादंबरीत लक्ष्मीकांत तांबोळी यांनी चित्रीत केली आहे. मराठवाड्यातल्या जिंतूर सारख्या खेड्यात संतबुवांनी स्थापन केलेला व आजूबाजूच्या ग्रामीण जनतेचा श्रध्दास्थान असलेला नृसिंहमठ हे या कादंबरीचे केंद्र आहे. शिक्षणाने आधुनिक झालेल्या माणसाच्या मनाच्या खोल कप्प्यात रुजलेली श्रध्देची मुळे शोधण्याचा प्रयत्न करणारी ही लक्षणीय कादंबरी आहे. कथालेखनाबरोबरच कादंबरी लेखन करणारे श्री. बंकट पाटील यांची " मंथान " ही प्रसिध्द झाली आहे. या कादंबरीतून " चंपा" नावाच्या नायिकेची कहाणी आहे परिस्थितीच्या चक्रात सापडलेल्या त्यातून बाहेर पडण्यासाठी तळमळणा-या तरीही नशिबाने तिला त्याच अंधार-यात्रेत ढकलणा-या एका अयशस्वी जीवनाची ही कथा ग्रामीण मानसिकतेची वास्तवता प्रगट करणारी आहे.

त्र्यंबक आसरडोहकर यांनी सुध्दा तीन कादंब-या लिहल्या आहेत. " हा-याना-या" " लीडर " व " काळी आई " अशी

त्यांच्या कादंबरींची नावे आहेत. अशिक्षीत, अडाणी शेतकरी लोकांना भूलथापा देऊन लूटणारे काही सुशिक्षित लोक खेडयात असतात त्यापैकीच एक हा-या व ना-या अशाप्रकारचे चित्रण त्यांच्या " हा-याना-या " या कादंबरीत आहे तर सामान्य जनतेचं दुःख व कष्ट हेच राजकारणी लोकांचे भांडवल असते हा 'लीडर' मधील कथेचा गाभा आहे. " काळी आई " मध्ये संपत्ती आली की विकृती वाढते या ग्रामीण वास्तवाची कल्पना करुन दिली आहे. गणेश आवटे यांची " चुकार " ही कादंबरीसुध्दा उल्लेखनीय आहे. परभणी -सेलू या भागात बोलली जाणारी बोली भाषा त्यांनी निवेदनासाठी वापरली आहे. ग्रामीण शेतकरी माणूस हा परंपरा व प्रतिष्ठा यांना जपणारा असतो याचे चित्रण त्यांच्या या कादंबरीतून येते.

नागनाथ कोत्तापल्ले हे ग्रामीण साहित्य चळवळीतील एक अग्रगण्य नाव. त्यांनी " उलट चालिला प्रवाहो " ( १९८५) आणि " गांधारीचे डोळे " ( १९८५) या दोन कादंब-या लिहिल्या आहेत. दलितवस्ती जळीत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गावात गेलेला नारायण हा नायक ग्रामीण जीवनातील जातीयता, वर्ण-व्यवस्था भेदभाव किती खालच्या थरावर गेलेले आहेत याचे प्रत्यंयतर येते. हे " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीचे वास्तव आहे तर गावातील राजकारणाने किती हिडीस, बेगडे रुप धारण केलेले आहे याचे समाजचित्रण " गांधारीचे डोळे " या कादंबरीत आहे . तर ग्रामीण भागातील सहकार क्षेत्रात किती भ्रष्टाचार माजला आहे. ग्रामीण भागातील लोकांचा विकास करण्यासाठी ही चळवळ राबवली जात नसून स्वतः पैसे खाण्यासाठी राबवली जात आहे. हे वास्तव वासुदेव मुलाटे यांच्या " विषवृक्षाच्या मुळया " ( १९८९) या कादंबरीतून प्रगट झाले आहे. या पार्श्वभूमीवर भीमराव वाघचौरे यांचे कादंबरीलेखन वैशिष्टयपूर्ण स्वरुपाचे दिसते. पुढील अभ्यासात

वाघचौरे यांच्या रानखळगी आणि पाणघळी या दोन्ही कादंब-यांचा तपशीलाने अभ्यास करावयाचा आहे.

## प्रकरण पहिले

## संदर्भ टीपा


| | |
|---|---|
| १. बांदिवडेकर, चंद्रकांत | मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती १९८९ पृ. ७ |
| २. हंस, कृष्णालाल | समीक्षाशास्त्र ग्रन्थम, रामबाग कानपूर, प्रथम संस्करण, १९७५, पृ. १५५ |
| ३. देशपांडे, कुसुमावती | मराठी कादंबरी/पहिले शतक मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई आवृत्ती दुसरी, १९७५ पृ. १६ |
| ४. कुलकर्णी, श्री. मा. | कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, नागपूर -२ आवृत्ती पहिली - १९५६ |
| ५. जाधव, रा. ग. | मराठी विश्वकोश खंड - ३ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, आवृत्ती पहिली - १९७६ पृ. ५९९ |
| ६. नेमाडे, भालचंद्र | मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप ( संपा. गो. मा. पवार म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई आवृत्ती पहिली १९८६ पृ. २४ |

७. गाडगीळ, गंगाधर — साहित्याचे मानदंड
पाप्युलर प्रकाशन, मुंबई
आवृत्ती पहिली, पृ. २०७

८. टंडन, प्रतापनारायण — हिंदी उपन्यास का उद्भव और
विकास, कल्पकार प्रकाशन,
लखनऊ, १९७४ पृ. १२

९. मालशे, स. गं. — साहित्य-सिध्दान्त
( अनुवादक ) — महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती
मंडळ, मुंबई आवृत्ती पहिली, १९८२

१0. टंडन, प्रतापनारायण — हिंदी उपन्यास का उद्भव और विकास
कल्पकार प्रकाशन, लखनऊ, १९७४
पृ. १२.

११. भालचंद्र नेमाडे यांनी या ग्रंथातील कादंबरीवरील आपल्या प्रदीर्घ निबंधात कादंबरी वाङ्मयात आढळणा-या तीन प्रवृत्तीचे विस्ताराने विवेचन केले आहे.
नेमाडे, भालचंद्र — टीकास्वयंवर
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
पहिली आवृत्ती, १९८९ पृ. १८८

१२. कुलकर्णी, भीमराव — पंडीत अनंत कुलकर्णी व्यक्ती आणि
संस्था,
( संपा. पंडीत कुलकर्णी ) कुलकर्णी
ग्रंथागार प्रकाशन, पुणे १९७२, पृ. १४६.

१३. यादव, आनंद — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.
पृष्ठ ६२.

१४. यादव, आनंद — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
पृष्ठ ६३

१५. यादव, आनंद — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
पृष्ठ ७६/७७

१६. यादव, आनंद — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे पृ. ७६

१७. माडगूळकर, अंबादास व खांडेकर, सूर्यकांत — मराठी ग्रामीण कथा,
लेखन वाचन भांडार पुणे
आवृत्ती पहिली, प्रस्तावना पृ. ४४-४५

१८. जाधव, रा. ग. — " मराठीत धुमाकूळ घालणारा एक नवसाम्राज्यवादी शब्द " महाराष्ट्र टाईम्स

१९. फडके, ना. सी. — प्रतिभा विलास
विश्वकर्मा साहित्यालय, आवृत्ती पहिली
१९६६ पृ. १९९

२०. अदवंत, म. ना. — (ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव, आनंद यादव)
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
आवृत्ती पहिली, १९८१, पृ. ७५ वरुन उद्धृत

२१. कुलकर्णी, मधू — महाराष्ट्र साहित्य पत्रिका
( ग्रामीण साहित्य विशेषांक )
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
जुलै- डिसे, १९८० पृ. ४५

२२. जोगळेकर, ग. ना. — महाराष्ट्र साहित्य पत्रिका
( ग्रामीण साहित्य विशेषांक )
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
जुलै, डिसे, १९८० पृ. ५५

२३. कोत्तापल्ले, नागनाथ — ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
आवृत्ती पहिली, १९८५ पृ. १५

२४. जोशी, लक्ष्मणशास्त्री — मराठी विश्वकोश खंड १०
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई आवृत्ती पहिली १९८१
पृ. ९७०.

२५. मालशे, स. गं. — तारतम्य, पवचुरे प्रकाशन मंदीर मुंबई
आवृत्ती पहिली, १९८७ पृ. ७

२६. रायकर, सीताराम — कृष्णराव भालेकर: समग्र वाङ्मय
महात्मा फुले समता प्रतिष्ठान पुणे
आवृत्ती पहिली, पृ. ५१-५२


13097
A

२७. यादव, आनंद — ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
आवृत्ती पहिली, १९८१, पृ. १२१.

२८. बापट, प्र. वा. — मराठी कादंबरी तंत्र आणि विकास
व्हीनस प्रकाशन, पुणे.
आवृत्ती दुसरी, १९५७ पृ. ३१३-३१४

२९. देशपांडे, कुसुमावती — मराठी कादंबरी पहिले शतक
मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
आवृत्ती दुसरी १९७३

30. यादव, आनंद — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
तिसरी आवृत्ती, १९९३ पृ. ६६

३१. यादव, आनंद — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
उ. नि. पृ. ६६

३२. पाटील, म. सु. — प्रतिष्ठान, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद.
( कादंबरी समीक्षा विशेषांक )
जाने. १९८१, पृ. ३५

३३. ठाकूर, रवींद्र — मराठी ग्रामीण कादंबरी
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
पहिली आवृत्ती, १९९३ पृ. ९६

३४. मंचरकर, र. बा. — महाराष्ट्र साहित्य पत्रिका
( ग्रामीण साहित्य विशेषांक )
जुलै-डिसें. १९८० पृ. ७७

३५. ठाकूर, रवींद्र — मराठी ग्रामीण कादंबरी
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
पहिली आवृत्ती, १९९३ पृ. १२९.

३६. शेळके, शांता — ललित
जून १९७२